SHIV VANI

# शिव वाणी

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

का.संपादक : वेदांत वैभव स्वामी

संपादक : वैभव विवेक स्वामी

● beedshivvani@gmail.com
● vaibhav11swami@gmail.com
● Mo.9422748792/ 9822628521
● SB / BEED / RNP / 279 / 2026 - 2028

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड ☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड ☎: 0220377, मो. 9405072777

| बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २४ वे | अंक-२६ | सोमवार, दि.२९ जून २०२६ | RNI-MAHMAR2003/14666 | किंमत: ३ रू. | पाने : ४ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-24 | Issue -26 | Monday, Dt.29 June 2026 | RNI-MAHMAR2003/14666 | Rupees - 3 Rs | PAGES - 4 |

## केंद्र सरकारचे मोठे निर्णय....



### मोदी सरकारचे महत्त्वपूर्ण निर्णय विकास, सुरक्षा आणि अर्थव्यवस्थेवर भर...

नवी दिल्ली । विशेष प्रतिनिधी

केंद्र सरकारने गेल्या आठवड्यात देशाच्या अर्थव्यवस्था, संरक्षण, शेती, उद्योग, आरोग्य आणि पायाभूत सुविधांना चालना देणारे अनेक महत्त्वपूर्ण निर्णय आणि उपक्रम जाहीर केले. त्यातील प्रमुख घडामोडी याप्रमाणे,

### संरक्षण उत्पादनासाठी सात नवे क्लस्टर...

नवी दिल्ली - देशांतर्गत संरक्षण उत्पादनाला गती देण्यासाठी संरक्षण मंत्रालयाने सात विशेष उत्पादन क्लस्टर उभारण्याची प्रक्रिया सुरू केली. यामुळे 'आत्मनिर्भर भारत' मोहिमेला बळ मिळणार आहे.

### कमकुवत मान्सूनच्या पार्श्वभूमीवर कृषी कृती आराखडा...

नवी दिल्ली - कमी पावसाचा फटका बसण्याची शक्यता लक्षात घेऊन ३०० हून अधिक जिल्ह्यांसाठी विशेष कृषी आराखडा तयार करण्यात आला आहे. शेतकऱ्यांना कमी पाण्यावर येणाऱ्या पिकांकडे वळण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

### ऊर्जा सुरक्षेवर विशेष लक्ष...

नवी दिल्ली - आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा आढावा घेत पेट्रोलियम, एलपीजी, खत आणि वीज पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केंद्राने संबंधित मंत्रालयांना आवश्यक तयारीचे निर्देश दिले.

### एमएसएमई उद्योगांना दिलासा..

नवी दिल्ली - लघु आणि मध्यम उद्योगांना वेळेत देयके मिळावीत यासाठी डिजिटल व्यवहार आणि वित्तपुरवठा यंत्रणा अधिक प्रभावी करण्यावर भर देण्यात आला.

### रेल्वे आणि राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांना गती..

नवी दिल्ली - देशभरातील अनेक रेल्वे आणि महामार्ग प्रकल्पांच्या अंमलबजावणीचा वेग वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे रोजगार आणि गुंतवणुकीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे.

### आरोग्य क्षेत्रात डिजिटल उपक्रम..

नवी दिल्ली - केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने पुढील आठवड्यात नवीन डिजिटल आरोग्य सुविधा आणि आरोग्य सेतू २.० सुरू करण्याची घोषणा केली असून त्याची तयारी पूर्ण करण्यात आली आहे.

### कृषी निर्यातीला चालना...

नवी दिल्ली - मध्य प्रदेशातील जीआय-टॅग प्राप्त रेवा सुंदरजा आंब्याची व्यावसायिक निर्यात संयुक्त अरब अमिरातीला सुरू करण्यात केंद्राने पुढाकार घेतला. यामुळे कृषी निर्यात वाढण्यास मदत होणार आहे.

### भारत-म्यानमार संबंध अधिक मजबूत...

नवी दिल्ली - पंतप्रधानांच्या पातळीवर भारत-म्यानमार द्विपक्षीय चर्चेत सुरक्षा, व्यापार आणि सीमावर्ती सहकार्यावर भर देण्यात आला.

### पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांचा आढावा..

नवी दिल्ली - केंद्र सरकारने विविध मंत्रालयांकडील प्रलंबित विकास प्रकल्पांचा आढावा घेऊन त्यांची जलद अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

### विकसित भारत २०४७ संकल्पनेला गती

नवी दिल्ली - सर्व मंत्रालयांनी विकासकामांमध्ये तंत्रज्ञान, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवून 'विकसित भारत २०४७'चे उद्दिष्ट साध्य करण्यावर भर द्यावा, असे केंद्र सरकारने पुन्हा स्पष्ट केले.

# जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

## शिक्षणाने गुणवत्ता तर ज्ञानाने संस्कार वाढतात- श्रीगुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज

## शिक्षण आणि अध्यात्म योग्य व्यक्तिमत्व घडवते- निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी







**बीड प्रतिनिधी**

**शिक्षणाने विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिकेत वाढ होते तर ज्ञानाने त्याच्या संस्कारामध्ये वाढ होते. या दोन्ही गोष्टी आत्मसात केल्यास एक संस्कारक्षम व्यक्तिमत्व घडते हा मार्ग दाखवण्याचे काम आम्ही करतोत असे अमूल्य विचार मानूरमठाचे मठाधिपती ष. ब्र.१०८ श्री गुरुविरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज यांनी व्यक्त केले. तर शिक्षण आणि अध्यात्म याची जोड बालवयापासून विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रुजवली तर तो आयुष्यामध्ये यशस्वी नागरिकच घडतो असे स्पष्ट प्रतिपादन बीड जिल्ह्याचे लोकप्रिय निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी व्यक्त केले.**

जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय आदर्श मुख्याध्यापिका जगदेवी विवेक स्वामी यांच्या स्मृतिप्रत्यर्थ २५ जून रोजीचे औचित्य साधून प्रतिवर्षी वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता दहावी आणि बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न होतो. यावर्षी हा १२ वा गुणगौरव सोहळा सामाजिक न्यायाचे प्रणेते लोककल्याणकारी राजे राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून २६ जून रोजी स.मा.गर्गे सभागृहामध्ये सकाळी ११ वाजता तीर्थक्षेत्र नागनाथ मानूरमठाचे मठाधिपती १०८ श्री गुरु वीरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज यांच्या अध्यक्षतेखाली गुरु आशीर्वादाने संपन्न झाला. सर्वप्रथम मान्यवरांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले.त्यानंतर संत शिरोमणी मन्मथ स्वामी, जगतज्योती महात्मा बसवेश्वर, शाहू महाराज, जगद्विवेक प्रतिष्ठानचे संस्थापक आदर्श मुख्याध्यापक स्वर्गीय विवेक स्वामी आणि आदर्श मुख्याध्यापिका स्वर्गीय जगदेवी स्वामी यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये प्रतिष्ठानचे सचिव पत्रकार वैभव स्वामी यांनी मागील बारा वर्षापासून वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार केला जात आहे. या निमित्ताने आई जगदेवी स्वामी यांच्या विचारातील शिक्षण, संस्कार आणि समाजाच्या प्रगतीचे स्वप्न या सर्वांचा संगम या गुण गौरव सोहळ्यातून जोपासला जात आहे असे स्पष्ट करून कार्यक्रमाच्या आयोजना मागील आपली प्रामाणिक भूमिका स्पष्ट केली. याप्रसंगी बीड जिल्ह्याचे निवासी जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी पुढे बोलताना म्हणाले की, माझ्यावर बाल वयापासून शिक्षणासोबतच आजोबांच्या, वडिलांच्या अध्यात्मिक शिक्षणाची बीजे रोवली गेली. मी आजही वीरशैव लिंगायत समाजातील सर्व धार्मिक विधी करू शकतो. मी प्रशासकीय अधिकारी असलो तरीदेखील अध्यात्मिक आणि धार्मिक विचारांचा पगडा सोडला नाही, उलट तो जोपासला. भावी पिढीने देखील आपली परंपरा, संस्कार जोपासले पाहिजेत ते वाढवले पाहिजेत यासाठी पालकांनी आपली नैतिक जबाबदारी पार पाडली पाहिजे. त्याचबरोबर शिक्षणाची कास धरून उत्तरोत्तर प्रगती करत कुटुंब आणि समाजाचे नाव उज्वल केले पाहिजे. अशी अपेक्षा आणि भावना व्यक्त केल्या. तर अध्यक्षीय समारोपामध्ये श्रीगुरु वीरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज पुढे बोलताना म्हणाले की, राजश्री शाहू महाराजांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले तर स्वर्गीय आदर्श मुख्याध्यापिका जगदेवी विवेक स्वामी या शिक्षक दांपत्याने त्या विचाराला आपल्या शिक्षक जीवनातून प्रत्यक्षात कृतीची जोड दिली. आणि पुढे त्यांच्या विचाराचा हा वारसा त्यांची मुलं विकास ◀◀ पान २ वर

## महाराष्ट्रातील सात मान्यवरांना 'पद्म' पुरस्कार प्रदान





**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**देशातील महत्वाचे नागरी सन्मान असलेल्या 'पद्म पुरस्कारांचे' वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते सन्मानपूर्वक करण्यात आले. महाराष्ट्रातील सात मान्यवरांना त्यांच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय योगदानाबद्दल गौरविण्यात आले.**

राष्ट्रपती भवनातील 'गणतंत्र मंडप' येथे आयोजित या समारंभास उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यासह अन्य केंद्रीय मंत्री आणि मान्यवर उपस्थित होते. पद्म पुरस्कार वितरणाच्या दुसऱ्या टप्प्यात देशभरातील ६५ मान्यवरांना पद्म पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये २ पद्मविभूषण, ७ पद्मभूषण आणि ५६ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील मान्यवरांपैकी प्रसिद्ध पार्श्वगायिका अलका याज्ञिक यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला.क्रीडा क्षेत्रातील ◀◀ पान २ वर

## ऊसतोड कामगारांची नोंदणी तातडीने आणि अचूकपणे पूर्ण करावी-आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे



**बीड । प्रतिनिधी**

राज्यातील ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी आणि त्यांना विविध शासकीय योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या ओळखपत्र वितरण प्रक्रियेला आता गती देणे गरजेचे आहे. तरी जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांची नोंदणी तातडीने आणि अचूकपणे पूर्ण करावी, असे कडक निर्देश महाराष्ट्र राज्याच्या समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून त्यांना ओळखपत्र वितरीत करणेबाबत बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हाधिकारी ◀◀ पान २ वर

## राज्यस्तरीय व्यसनमुक्ती कार्यशाळा संपन्न



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, सहाय्यक आयुक्त कार्यालय, समाजकल्याण विभाग, छत्रपती संभाजीनगर तसेच आयुष व्यसनमुक्ती उपचार व संशोधन केंद्र, बार्शी (जि. सोलापूर) यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ सेवन व अवैध तस्करी विरोधी दिन तसेच नशामुक्त भारत अभियान अंतर्गत राज्यस्तरीय व्यसनमुक्ती कार्यशाळा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, छत्रपती संभाजीनगर ◀◀ पान २ वर

## लातूर आरटीओची परराज्यात नोंदणीकृत प्रवासी बसेसवर धडक कारवाई




**लातूर । प्रतिनिधी**

**प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत परराज्यात नोंदणी असलेल्या आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या प्रवासी बसेसवर कडक कायदेशीर कारवाईची धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे.**

या कारवाई अंतर्गत लातूर आरटीओच्या वायुवेग पथकाद्वारे मोठी कामगिरी बजावण्यात आली असून, यामध्ये माहे मे २०२६ मध्ये ४८ दोषी वाहनांवर कारवाई करून ७ लाख ५७ हजार ०९९ रुपये दंड वसूल करण्यात आला, तर माहे जून २०२६ मध्ये १७ दोषी वाहनांवर कारवाई करत ५ लाख ९२ हजार ७६५रुपये इतका एकूण दंड वसूल करण्यात आला आहे. परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या ◀◀ पान २ वर

# महायुतीचा सर्व जागेवर झेंडा तर महाआघाडीला मोठा धक्का.!

## स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या निकालातून फडणवीस-शिंदे-पवार यांचे वर्चस्व सिद्ध






**बीड । विशेष प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील निवडणुकांचे निकाल सोमवारी जाहीर झाले. राज्यातील १६ स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ आणि एका पोटनिवडणुकीसह एकूण १७ जागांसाठी झालेल्या निवडणुकांमध्ये महायुतीने जवळपास एकहाती वर्चस्व प्रस्थापित करत १७ पैकी १६ जागांवर विजय मिळवला. या निकालाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या नेतृत्वाला मोठी राजकीय ताकद मिळाली आहे.

### निवडणुकीत कोण विजयी झाले ?

उपलब्ध निकालांनुसार भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्या महायुतीने बहुतांश जागा जिंकल्या. मात्र नाशिक स्थानिक प्राधिकारी मतदारसंघात अपक्ष उमेदवार गोकुळ गिते यांनी महायुतीच्या अधिकृत उमेदवाराचा पराभव करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. हा निकाल शिंदे गटासाठी धक्कादायक मानला जात आहे.

### नाशिकचा निकाल महायुतीसाठी इशारा... गोकुळ गिते यांच्या विजयामुळेचौकट...

**२०२९ साठीचा संदेश...**

स्थानिक प्राधिकारी मतदारसंघातील हे निकाल केवळ विधान परिषद निवडणूक म्हणून पाहता येणार नाहीत. हे निकाल राज्यातील आगामी महापालिका, जिल्हा परिषद आणि पुढील विधानसभा निवडणुकांचे संकेत मानले जात आहेत. महायुतीचा आत्मविश्वास वाढला असून विरोधकांसमोर संघटनात्मक पुनर्बांधणीचे मोठे आव्हान उभे राहिले आहे. महायुतीतील अंतर्गत नाराजी समोर आली. हा निकाल स्थानिक पातळीवरील गटबाजी आणि तिकिट वाटपातील नाराजीचे द्योतक मानला जात आहे.

### महायुतीची पकड मजबूत...

स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नगरसेवक, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि इतर लोकप्रतिनिधींनी महायुतीला मोठा कौल दिला. यामुळे राज्यातील सत्ताधारी आघाडीची संघटनात्मक ताकद पुन्हा सिद्ध झाली आहे.

### महाविकास आघाडीची मतफूट उघड...

धाराशिव-लातूर-बीडसारख्या मतदारसंघांमध्ये महाविकास आघाडीची अपेक्षित मते उमेदवारांना मिळाली नाहीत. अनेक ठिकाणी क्रॉस व्होटिंग व मतफुटीची चर्चा रंगली असून विरोधी आघाडीतील समन्वयाचा अभाव स्पष्ट झाल्याचे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

SHIV VANI
शिव वाणी
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी
संपादकीय 2
सोमवार, दि.२९ जून २०२६
Monday, Dt. 29 June 2026

# अग्रलेख....

## जनतेचे प्रश्न की राजकीय रणांगण. ?

### पावसाळी अधिवेशन दोघांच्याही कसोटीवर..!

बीड – लोकशाहीमध्ये विधानमंडळाचे अधिवेशन हे केवळ सत्ताधारी आणि विरोधकांनी एकमेकांवर आरोप–प्रत्यारोप करण्याचे व्यासपीठ नसते.ते जनतेच्या आशा–अपेक्षांचे प्रतिनिधित्व करणारे सर्वोच्च लोकशाही मंच असते.
महाराष्ट्राच्या आगामी पावसाळी अधिवेशनाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. कारण राज्यासमोर आज शेतकरी, बेरोजगारी, महागाई, पावसामुळे झालेले नुकसान, पायाभूत सुविधा, कायदा–सुव्यवस्था, आरक्षण, शिक्षण आणि आरोग्य असे अनेक गंभीर प्रश्न उभे आहेत.
अशा वेळी अधिवेशन हे घोषणांचा उत्सव नव्हे, तर उत्तरदायित्वाचा आरसा ठरले पाहिजे.
सत्ताधाऱ्यांसाठी हा काळ स्वतःच्या कामगिरीचा हिशेब देण्याचा आहे. निवडणुकीत दिलेली आश्वासने, जाहीर केलेल्या योजनांची अंमलबजावणी, निधीचे वितरण, शेतकरी आणि सामान्य नागरिकांना दिलासा देण्यासाठी उचललेली पावले.याबाबत स्पष्ट आणि पारदर्शक माहिती सभागृहात मांडणे ही त्यांची जबाबदारी आहे. विरोधकांनी प्रश्न विचारले की त्यांना टाळणे, गोंधळात वेळ घालवणे किंवा केवळ राजकीय प्रतिहल्ले करणे ही लोकशाहीची अपेक्षा नाही.
पण दुसरीकडे विरोधकांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची आहे. विरोध म्हणजे केवळ घोषणाबाजी, वेलमध्ये उतरणे, कामकाज बंद पाडणे किंवा प्रत्येक विषयाचे राजकारण करणे नव्हे. जनतेच्या प्रश्नांवर अभ्यासपूर्ण, आकडेवारीसह आणि पर्यायी उपाय मांडणारा विरोधच लोकशाहीला बळकटी देतो. सरकारला जबाबदार धरणे आणि पर्याय सुचवणे हे विरोधकांचे कर्तव्य आहे.
महाराष्ट्रातील अनेक भाग अजूनही दुष्काळसदृश परिस्थितीचा सामना करत आहेत, तर काही भागात अतिवृष्टीमुळे शेती, घरे आणि रस्त्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना मदत, पिकविमा, नुकसानभरपाई, सिंचन, रोजगार, उद्योग गुंतवणूक, शिक्षणातील गुणवत्ता, आरोग्य सेवा आणि कायदा–सुव्यवस्था यांसारखे विषय अधिवेशनाच्या केंद्रस्थानी असले पाहिजेत. जर हे विषय बाजूला पडून वैयक्तिक टीका, पक्षांतराचे राजकारण किंवा केवळ माध्यमांचे लक्ष वेधून घेणारे वादच चर्चेत राहिले, तर त्याचे नुकसान जनतेलाच होईल.
लोकशाहीतील सर्वात मोठा अपव्यय म्हणजे सभागृहाचा वाया गेलेला वेळ. प्रत्येक मिनिटासाठी जनतेच्या करातून खर्च होतो. त्यामुळे कामकाज ठप्प करणे किंवा चर्चेला टाळाटाळ करणे हे दोन्हीही जनतेशी अन्याय करणारे आहे.
सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना केवळ राजकीय प्रतिस्पर्धी म्हणून न पाहता त्यांच्या मुद्द्यांना उत्तर द्यावे. विरोधकांनीही प्रत्येक मुद्द्यावर संघर्ष करताना विधायक भूमिका ठेवावी. सभागृहात आवाज असावा, पण तो जनतेच्या प्रश्नांचा; संघर्ष असावा, पण तो उपायांसाठी; टीका असावी, पण ती तथ्यांवर आधारित.
पावसाळी अधिवेशनातून राज्याला दिशा मिळाली पाहिजे. घोषणांपेक्षा निर्णय, आरोपांपेक्षा उत्तरदायित्व आणि गदारोळापेक्षा विधायक चर्चा यांना प्राधान्य मिळाले, तरच हे अधिवेशन यशस्वी ठरेल.
हे अधिवेशन सत्ताधाऱ्यांसाठी कामगिरी सिद्ध करण्याची आणि विरोधकांसाठी सक्षम पर्याय म्हणून स्वतःला सिद्ध करण्याची संधी आहे. या दोघांपैकी कोणीही जनतेच्या अपेक्षांना न्याय दिला नाही, तर निकाल पुढील निवडणुकीत मतदार देतील. लोकशाहीत अंतिम निर्णय सभागृहात नाही, तर मतपेटीत होतो. त्यामुळे दोन्ही बाजूंनी राजकारणापेक्षा जनकारणाला प्राधान्य देणे, हीच काळाची खरी गरज आहे.

# परिवर्तनाचे शिल्पकार : राजर्षी शाहू महाराज

**कोल्हापूर– अवघ्या ४८ वर्षांच्या आयुष्यात समता, सामाजिक न्याय आणि शिक्षणाच्या माध्यमातून परिवर्तनाचा नवा आदर्श घालून देणाऱ्या, समाजाला प्रगतीची दिशा दाखविणाऱ्या लोकराजाला मानाचा मुजरा... त्यांच्या १५२ व्या जयंती निमित्त...**



२६ जून १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात यशवंतराव म्हणून जन्मलेले राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे केवळ एका संस्थानाचे अधिपती नव्हते, तर सामाजिक न्याय, शिक्षण, समता आणि मानवतेचे युगप्रवर्तक विचारवंत होते. १७ मार्च १८८४ रोजी कोल्हापूरच्या गादीवर दत्तक गेल्यानंतर आणि २ एप्रिल १८९४ रोजी राज्यकारभार स्वीकारल्यानंतर त्यांनी सत्ता ही जनकल्याणाचे साधन असते, हे आपल्या कार्यातून सिद्ध केले. म्हणूनच त्यांना 'लोकराजा' आणि 'लोककल्याणकारी राजा' म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्र शासन त्यांच्या जन्मदिनाचे 'सामाजिक न्याय दिन' म्हणून पालन करते, ही त्यांच्या कार्याची सर्वोच्च पावती आहे.

शाहू महाराजांवर महात्मा ज्योतिराव फुले आणि सत्यशोधक विचारांचा गाढा प्रभाव होता. समाजातील विषमता, जातिभेद, अज्ञान आणि दारिद्र्य यांचे मूळ शिक्षणाच्या अभावात आहे, हे त्यांनी ओळखले. त्यामुळे त्यांनी शिक्षणाला समाजपरिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. 'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही' हा त्यांचा विचार आजही तितकाच समर्पक आहे. १९१७ मध्ये त्यांनी कोल्हापूर संस्थानात सक्तीचे आणि मोफत प्राथमिक शिक्षण लागू केले. प्रत्येक गावात शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. ग्रामीण, गरीब आणि वंचित मुलांनाही शिक्षणाची समान संधी मिळावी म्हणून विविध समाजघटकांसाठी वसतिगृहे उभारली. म्हणूनच त्यांना भारतातील वसतिगृह चळवळीचे आद्य जनक मानले जाते.

आजच्या काळात शिक्षणाची व्याप्ती वाढली असली, तरी शिक्षणातील गुणवत्ता, मूल्ये आणि समान संधी अधिक सुधारण्याची गरज आहे. शाहू महाराजांनी दिलेला संदेश स्पष्ट होता,शिक्षण हे केवळ नोकरीसाठी नव्हे, तर विचारक्षम, जबाबदार आणि सुसंस्कृत समाज घडविण्यासाठी असते. आजच्या तरुणांनी त्यांच्या या विचाराचा स्वीकार करून ज्ञानासोबत सामाजिक संवेदनाही जोपासणे आवश्यक आहे.

शाहू महाराजांनी सामाजिक न्यायाची संकल्पना केवळ मांडली नाही, तर ती प्रत्यक्ष कृतीत उतरवली. १९०२ मध्ये त्यांनी मागासवर्गीयांसाठी शासकीय सेवेत आरक्षण लागू केले. भारतातील आरक्षणाच्या धोरणाचा हा पहिला ऐतिहासिक प्रयोग होता. सार्वजनिक विहिरी, शाळा, दवाखाने आणि सरकारी कार्यालये सर्वांसाठी खुली केली. अस्पृश्यता, वेठबिगारी, महार वतने, जातीय भेदभाव आणि सामाजिक अन्यायाविरुद्ध त्यांनी कायदे करून कठोर भूमिका घेतली. आंतरजातीय विवाह, विधवा पुनर्विवाह, स्त्रियांचे शिक्षण आणि महिलांच्या सन्मानासाठी त्यांनी प्रगतिशील निर्णय घेतले. त्यांच्यासाठी प्रत्येक माणूस हा प्रथम माणूस होता.जात, धर्म किंवा पंथ हे दुय्यम होते.राजर्षी शाहू महाराजांनी केवळ सामाजिक सुधारणा केल्या नाहीत, तर आर्थिक आणि कृषी विकासालाही समान महत्त्व दिले. शेतकऱ्यांच्या हितासाठी बाजारपेठा उभारल्या, राधानगरी धरणासारखे दूरदृष्टीचे प्रकल्प राबवले, सहकार चळवळीची मुहूर्तमेढ रोवली आणि उद्योगधंद्यांना चालना दिली. तांत्रिक शिक्षण, लष्करी शिक्षण आणि कौशल्याधारित प्रशिक्षणाला प्रोत्साहन देऊन त्यांनी स्वावलंबी समाजाची पायाभरणी केली. विकास हा सर्वसमावेशक असला पाहिजे, हा त्यांचा दृष्टिकोन आजच्या 'शाश्वत विकास' या संकल्पनेशी पूर्णपणे सुसंगत आहे.

शाहू महाराजांनी कला, क्रीडा आणि संस्कृतीलाही तितकेच महत्त्व दिले. संगीत, नाटक, चित्रकला आणि कुस्तीला त्यांनी राजाश्रय दिला. बालगंधर्व, केशवराव भोसले, बाबूराव पेंटर यांसारख्या अनेक प्रतिभांना त्यांनी प्रोत्साहन दिले. समाजाचा विकास केवळ अर्थकारणाने होत नाही; संस्कृती, कला आणि मानवी मूल्ये यांच्यामुळेच राष्ट्र समृद्ध होते, हा त्यांचा व्यापक दृष्टिकोन होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याला त्यांनी दिलेले पाठबळ, मूकनायक या वृत्तपत्राला केलेले साहाय्य आणि दलित समाजाच्या नेतृत्वाबाबत व्यक्त केलेला विश्वास यामुळे भारतीय सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात शाहू महाराजांचे स्थान अधिक उंचावते. त्यांनी समाजातील शेवटच्या घटकाला केंद्रस्थानी ठेवून शासन चालवले. सत्ता ही विशेषाधिकार नसून जबाबदारी आहे, हे त्यांनी आपल्या प्रत्येक निर्णयातून दाखवून दिले.

६ मे १९२२ रोजी अवघ्या वयाच्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी त्यांचे निधन झाले. परंतु त्यांच्या विचारांचे आयुष्य आजही अखंड सुरू आहे. आधुनिक भारतात समता, सामाजिक न्याय, गुणवत्तापूर्ण शिक्षण, स्त्री–पुरुष समानता, आरक्षण, सर्वसमावेशक विकास आणि मानवी हक्क यांविषयी जे विचार आपण स्वीकारतो, त्यांची बीजे राजर्षी शाहू महाराजांनी शंभर वर्षांपूर्वीच रोवली होती.

आजच्या तरुण पिढीसमोर तंत्रज्ञान, स्पर्धा आणि जागतिक संधींचे नवे क्षितिज खुले झाले आहे. अशा वेळी शाहू महाराजांचा आदर्श आपल्याला सांगतो की, खरे शिक्षण तेच, जे स्वतःला उन्नत करताना समाजालाही उभारी देते; खरा विकास तोच, जो शेवटच्या माणसापर्यंत पोहोचतो; आणि खरे नेतृत्व तेच, जे सत्तेपेक्षा सेवेला मोठे मानते. म्हणूनच राजर्षी छत्रपती शाहू महाराज हे केवळ इतिहासातील महान राजा नाहीत, तर भविष्याचा मार्ग दाखवणारे लोकनेते आहेत. त्यांच्या विचारांचा वारसा जपणे, समतेचा समाज घडवणे आणि शिक्षणातून मानवतेची उभारणी करणे, हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल.

संकलन व लेखन
सचिन अडसूळ,
जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर

## विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहीम यशस्वी करण्यासाठी समन्वयाने काम करा – मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम



**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यात राबविण्यात येत असलेल्या विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्यापक जनजागृती, लोकप्रतिनिधी व सामाजिक संस्थांचा सहभाग तसेच प्रशासनातील सर्व यंत्रणांमध्ये समन्वय आवश्यक असून, कोणताही पात्र नागरिक मतदार यादीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे निर्देश अप्पर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित विशेष सखोल मतदार पुनरीक्षण मोहिमेच्या आढावा व मार्गदर्शन बैठकीत ते बोलत होते. यावेळी नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, परभणी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, धाराशिव जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, हिंगोली जिल्हा अधिकारी राहुल गुप्ता, जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर आयुक्त खुशालसिंह परदेशी, मंजुषा मिसकर यांच्यासह संबंधित अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## एकल महिलांच्या सन्मान, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी व्यापक धोरण राबविणार – मंत्री आदिती तटकरे



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील अंदाजे ५० ते ५५ लाख एकल महिलांच्या सन्मान, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी स्वतंत्र व व्यापक धोरण राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, त्यांच्या हितसंवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे प्रतिपादन महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी केले.

यावेळी मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते तसेच जिल्हाधिकारी आंचल गोयल यांच्या उपस्थितीत महिला व बाल विकास विभागाच्या विविध योजनांची माहिती देणाऱ्या क्यूआर कोडचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमात जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी शोभा शेलार यांनी एकल महिला धोरणा विषयी सविस्तर माहिती दिली.

## आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त अमृत योग वर्ग कार्यक्रम संपन्न

**रायगड–अलिबाग।प्रतिनिधी**

**महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था यांच्या वतीने (दि.२१ जून रोजी) अमृत रायगड–अलिबाग कार्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त अमृत योग वर्ग संपन्न झाला.**



अमृत रायगड जिल्हा कार्यालय अलिबाग च्या पटांगणात आंतराष्ट्रीय योग दिवस साजरा केला. या निमित्ते योग प्रशिक्षक कुमार जोगळेकर यांनी परिसरातील मुलांना योग चे प्रात्यक्षिक दाखवून करवून घेतले. अमृत सखी कु.जान्हवी साठे हिने सर्व मुलांसाठी योग साधनेनंतर थंड पेयाची सोय केली. योग प्रशिक्षक कुमार जोगळेकर यांचे स्वागत व आभार जिल्हा व्यवस्थापक शैलेश विनायक मराठे यांनी केले..

## सांगली–सातारा स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणुकीत धैर्यशिल ज्ञानदेव कदम विजयी

सांगली । प्रतिनिधी

सांगली सह सातारा स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ विधान परिषद निवडणूक २०२६ मध्ये धैर्यशिल ज्ञानदेव कदम हे उमेदवार विजयी झाल्याचे जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी जाहीर केले. निवडणुकीची मतमोजणी तरुण भारत व्यायाम मंडळ इमारत, सांगली येथे पार पडली. निवडणूक निरीक्षक डॉ. अमित सैनी व निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. मैनाक घोष यांच्या प्रमुख उपस्थितीत सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. स्नेहल कनिचे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी अपर जिल्हाधिकारी सुशांत खांडेकर, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी नागेश पाटील, उपजिल्हाधिकारी शिवाजी जगताप यांच्यासह मतमोजणीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# उस्मानाबाद - लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणुकीत भाजपाचे बसवराज पाटील यांचा ऐतिहासिक विजय

## पाटील यांना ८४४ तर देशमुख यांना १२५ मते,१४ मते ठरली अवैध, ७१९ मतांनी पाटील यांचा दणदणीत विजय

**धाराशिव । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उस्मानाबाद– लातूर– बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या आज २२ जून रोजी झालेल्या मतमोजणीत भाजपचे उमेदवार बसवराज माधवराव पाटील यांनी विजय मिळविला.पाटील यांना एकूण ८४४ मते मिळाली,तर त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे महेश माणिकराव देशमुख यांना १२५ मते मिळाली.त्यामुळे बसवराज पाटील यांनी तब्बल ७१९ मतांच्या फरकाने दणदणीत विजय संपादन केला.**

मतमोजणीच्या अंतिम निकालानुसार भाजपाच्या बसवराज माधवराव पाटील यांना टेबल क्रमांक १ वर १८४,टेबल क्रमांक २ वर १४४,टेबल क्रमांक ३ वर १९१,टेबल क्रमांक ४ वर १७७ आणि टेबल क्रमांक ५ वर १४८ अशी एकूण ८४४ मते मिळाली.दुसरीकडे महेश माणिकराव देशमुख यांना अनुक्रमे १०,५५,६,२१ आणि ३३ अशी एकूण १२५ मते मिळाली.मतमोजणी दरम्यान १४ मते अवैध ठरली. त्यामध्ये टेबल क्रमांक १ वर ६,टेबल क्रमांक २ वर १,टेबल क्रमांक ३ वर ३, टेबल क्रमांक ४ वर २ आणि टेबल क्रमांक ५ वर २ अवैध मतांचा समावेश होता. या निवडणुकीत एकूण ९८३ मतपत्रिका प्राप्त झाल्या.त्यापैकी १४ मते अवैध ठरल्याने ९६९ वैध मते ग्राह्य धरण्यात आली.निवडून येण्यासाठी आवश्यक कोटा ४८५ मतांचा होता.बसवराज पाटील यांनी हा कोटा सहज पार करत विजयावर शिक्कामोर्तब केले.कार्यकर्त्यांनी निकाल जाहीर होताच जल्लोष साजरा केला.



## पान १ वरून....

### जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने

आणि वैभव समर्थपणे पुढे घेऊन जात आहेत. ही बाब निश्चितच आदर्शवत आणि कौतुकास्पद आहे. आम्ही गुरुवर्य म्हणून समाजाला चांगला मार्ग दाखवण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. त्या मार्गावरून आपण जायचे का बिघडायचे हे तुमच्या हातात आहे. मात्र अशा कार्यक्रमातून, उपक्रमातून समाज घडवण्याचे कार्य होत आहे. ही बाब नक्कीच कौतुकास्पद आहे. आपण सर्वांनी शिक्षणासोबतच आध्यात्मिक, धार्मिक ज्ञान आत्मसात करणे गरजेचे आहे. केवळ शैक्षणिक गुणवत्ता घेऊन तुम्ही आयुष्यामध्ये यशस्वी होऊ शकणार नाहीत. त्यासाठी ज्ञानाचे संस्कार आपल्या शिदोरीला गरजेचे आहेत. तरच आपले आयुष्य खऱ्या अर्थाने यशस्वी होईल असे विचार व्यक्त केले. याप्रसंगी जेष्ठ पत्रकार संपादक संतोष मानूरकर म्हणाले की, जगद्विवेक प्रतिष्ठानच्या माध्यमातून स्वामी कुटुंबीय वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत अशा उपक्रमातून भावी पिढीला शिक्षण आणि अध्यात्माची सांगड घालून संस्कारक्षम नागरिक घडवण्याचे कार्य करत आहेत हे नक्कीच आदर्शवत असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन वैभव स्वामी आणि सौ. जया स्वामी यांनी केले. तर कार्यक्रमाच्या आभारामध्ये प्रतिष्ठानचे अध्यक्ष सहशिक्षक विकास स्वामी म्हणाले की, आई–वडिलांचे विचार आम्ही पुढे घेऊन जाण्यामध्ये केवळ निमित्त मात्र आहोत.खऱ्या अर्थाने आपणच या कार्यक्रमाचे खरे यशस्वी आयोजक आहात.आपल्यामुळेच दरवर्षी कार्यक्रमाची उंची वाढत आहे. त्यामुळे मान्यवरांसह गुणवंत विद्यार्थी, त्यांचे पालक आणि समाज बांधवांचे मी आभार व्यक्त करतो अशा भावना व्यक्त केल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशांत स्वामी, सौ वनमाला स्वामी, सौ वर्षा स्वामी, सौ योजना स्वामी,सौ प्रतिभा स्वामी, सौ अंजली स्वामी, सौ जया स्वामी,सौ सुरेखा स्वामी, विशाल स्वामी, संतोष स्वामी, सुनील स्वामी, शशांक स्वामी, वेदांत स्वामी, सार्थक स्वामी, श्रावणी स्वामी आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला गुणवंत विद्यार्थ्यांसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.राष्ट्रगीता नंतर अल्पोपहारणे कार्यक्रमाची सांगता झाली.

-------------

### ऊसतोड कामगारांची नोंदणी तातडीने आणि

विवेक जॉन्सन, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, समाज कल्याण सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांची प्रमुख तर सर्व तहसीलदार व गट विकास अधिकारी यांची व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ऑनलाईन उपस्थिती होती.क्षेत्रीय स्तरावर काम करताना येणाऱ्या अडचणी दूर करून त्वरित प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करावी. असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी यावेळी दिले.

----------

### महाराष्ट्रातील सात मान्यवरांना

उत्कृष्ट कामगिरीबद्दल भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार रोहित शर्मा यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. वैद्यकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल डॉ. आर्मिडा फर्नांडिस यांना पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला.वारली आदिवासी परंपरेचे जतन करणारे ८९ वर्षीय तारपावादक भिकल्या लाडक्या धिंडा यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. अभिनेते, पटकथा लेखक, निर्माते आणि दिग्दर्शक आर. माधवन यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ अभिनेते सतीश शाह यांना कला क्षेत्रातील योगदानाबद्दल मरणोत्तर पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या वतीने हा पुरस्कार त्यांचे बंधू अरविंद मामनिया यांनी स्वीकारला.उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल अशोक खाडे यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. यंदाच्या पद्म पुरस्कारांसाठी एकूण १३१ पुरस्कारांची घोषणा करण्यात आली होती. त्यामध्ये ५ पद्मविभूषण, १३ पद्मभूषण आणि ११३ पद्मश्री पुरस्कारांचा समावेश आहे. पुरस्कारार्थींमध्ये १९ महिलांचा समावेश असून १६ मान्यवरांना मरणोत्तर सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

------------

### लातूर आरटीओची परराज्यात नोंदणीकृत

आदेशानुसार ही मोहीम राबविण्यात येत आहे.प्रादेशिक परिवहन कार्यालय येथील वायुवेग पथकाद्वारे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम युद्धपातळीवर सुरू असून, भविष्यातही अशा प्रकारची कडक कारवाई सुरू राहील, अशी माहिती लातूर प्रादेशिक परिवहन कार्यालया मार्फत देण्यात आली आहे.

-----------

### राज्यस्तरीय व्यसनमुक्ती

येथे संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण आर. एम. शिंदे हे होते. प्रमुख पाहुणे अमली पदार्थविरोधी टास्क फोर्सच्या पोलीस निरीक्षक श्रीमती गीता बागवडे, पोलीस निरीक्षक, , डॉ. संदीप तांबारे, डॉ. बालाजी जाधव, डॉ. कविता आंधारे, उपस्थित होते.सूत्रसंचालन सौ. अनुपमा शेटे यांनी केले.

------------

# पावसाळी अधिवेशन २०२६ विधानसभा कामकाज आणि प्रश्नोत्तरे

## महाराष्ट्र शासनाचे महत्त्वपूर्ण निर्णय...



### पावसाळी अधिवेशनाआधी, फडणवीस सरकारचा निर्णयांचा धडाका.!

मुंबई । विशेष प्रतिनिधी

पावसाळी अधिवेशनाच्या तोंडावर राज्य सरकारने विकासाभिमुख आणि प्रशासनिक सुधारणा करणाऱ्या महत्त्वपूर्ण निर्णयांची मालिका जाहीर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत ग्रामीण पाणीपुरवठा, डिजिटल पायाभूत सुविधा, वैद्यकीय सेवा, रोजगार, प्रशासन आणि उद्योग क्षेत्राशी संबंधित अनेक निर्णयांना मंजुरी देण्यात आली. या निर्णयांमुळे राज्यातील विकासकामांना गती मिळणार असल्याचा सरकारचा दावा आहे.

### ग्रामीण पाणीपुरवठ्यासाठी नवे धोरण..

मुंबई – राज्यातील ग्रामीण भागात दीर्घकालीन आणि शाश्वत पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी नवीन ग्रामीण पाणीपुरवठा धोरणाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. पाण्याचे नियोजन, वितरण आणि देखभाल अधिक सक्षम करण्यावर भर देण्यात आला आहे.

### नागपूरमध्ये अत्याधुनिक मेडिकल सायक्लोट्रॉन प्रकल्प

मुंबई – कर्करोगासह गंभीर आजारांच्या निदानासाठी नागपूर येथे उच्च क्षमतेचा मेडिकल सायक्लोट्रॉन प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. हा प्रकल्प मध्य भारतासाठी महत्त्वाचा आरोग्य प्रकल्प मानला जात आहे.

### भारत नेटला गती..

ग्रामीण भागात वेगवान इंटरनेट सेवा उपलब्ध व्हावी यासाठी भारतनेट प्रकल्पाच्या विस्ताराला मंजुरी देण्यात आली. डिजिटल सेवा, ऑनलाइन शिक्षण आणि ई–गव्हर्नन्सला यामुळे मोठी चालना मिळणार आहे.

### ड्रोन आणि मानवरहित प्रणाली धोरण..

मुंबई – कृषी, उद्योग, आपत्ती व्यवस्थापन आणि सुरक्षा क्षेत्रात ड्रोन तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यासाठी नवीन धोरण मंजूर करण्यात आले. यामुळे राज्यात ड्रोन उद्योगाला प्रोत्साहन मिळण्याची अपेक्षा आहे.

### जात वैधता प्रमाणपत्राच्या मुदतीत वाढ..

मुंबई – विद्यार्थी आणि नोकरीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना दिलासा देत जात वैधता प्रमाणपत्रा संदर्भातील मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला.

### रोजगार हमी कायद्यात सुधारणा..

मुंबई – ग्रामीण रोजगार हमी योजनांची अंमलबजावणी अधिक परिणामकारक करण्यासाठी संबंधित कायद्यात सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली.

### प्रशासनिक पुनर्रचना...

मुंबई – राज्य शासनाच्या विभागांची संख्या वाढवून कामकाज अधिक गतिमान करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. विविध विभाग स्वतंत्र केल्याने निर्णयप्रक्रिया अधिक जलद होईल, असा सरकारचा दावा आहे.

### उच्च शिक्षण आणि उद्योग क्षेत्राला चालना..

मुंबई – नवीन महाविद्यालये, अभ्यासक्रम मंजुरी प्रक्रिया सुलभ करण्यासह चखऊ ला अधिक निधी उभारण्याची क्षमता देणाऱ्या कायद्यात सुधारणा करण्यास मंजुरी देण्यात आली.

पावसाळी अधिवेशनापूर्वी घेतलेले हे निर्णय विकासाभिमुख असल्याचा दावा सरकार करत असले, तरी त्यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीवर विरोधक सरकारला घेरण्याची शक्यता आहे. विशेषतः पाणी, शेती, रोजगार, आरोग्य आणि प्रशासनातील सुधारणा प्रत्यक्षात कितपत उतरतात, यावर सरकारच्या कामगिरीचे मूल्यांकन होणार आहे.

### लातूरमध्ये ३० जून रोजी 'एकल महिला धोरणा'बाबत जिल्हास्तरीय कार्यशाळा

लातूर प्रतिनिधी

राज्यातील एकल महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, कायदेशीर, आरोग्यविषयक व पुनर्वसनासंदर्भातील प्रश्नांचा सर्वकष विचार करून त्यांच्यासाठी स्वतंत्र व प्रभावी धोरण तयार करण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये घोषणा केली होती. त्यानुसार सूचना व अभिप्राय प्राप्त करण्यासाठी मंगळवार, ३० जून २०२६ रोजी सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण सभागृह, जिल्हा परिषद, लातूर येथे जिल्हास्तरीय बैठक व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेला संबंधित घटकांनी, अभ्यासकांनी आणि माध्यम प्रतिनिधींनी लेखी स्वरूपात सूचनांसह उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन लातूर जिल्हा परिषदेचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी जावेद शेख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

## अमरावती येथील अभ्यासिका प्रकरणातील अनियमित्तेबाबत दोषींवर कारवाई–आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके

मुंबई : अमरावती शहरात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या अभ्यासिका प्रकरणातील अनियमिततेबाबात संबधित वसतिगृहाचे तत्कालीन प्रभारी गृहप्रमुख आणि गृहप्रमुख (आहरण व संवितरण) यांना निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणाची चौकशी करण्यात येत असून चौकशीत दोषी आढळून येणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, असे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी विधानसभेत सांगितले.

अमरावती येथील आदिवासी विकास विभागामार्फत अभ्यासिका भाड्याने घेण्याच्या करारात झालेल्या अनियमितेतेबाबत सदस्य सुलभा खोडके यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य सर्वश्री विजय वडेट्टीवार, डॉ. नितीन राऊत, हरिष पिंपळे, नाना पटोले यांनी उपप्रश्न विचारात चर्चेत सहभाग घेतला.

### बनावट केळी लागवड दाखवून तब्बल १६४.५८ कोटी पीक विमा घेणाऱ्या दोषींवर कारवाई करणार –कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई : जळगाव जिल्ह्यात केळीची बनावट लागवड दाखवून पीक विमा मिळविल्याच्या प्रकरणाची चौकशी सुरू असून, चौकशीत जे दोषी आढळतील त्यांच्यावर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी गुरुवारी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली. यासंदर्भात सदस्य अजय चौधरी यांनी प्रश्न उपस्थित केला होता. २७ हजार ४१६ अर्जदारांनी केळीची लागवड नसताना २८ हजार ४७५.०१ हेक्टर क्षेत्रासाठी पीक विमा घेतल्याचे निदर्शनास आले. या तपासणीमुळे विमा हप्त्याच्या सुमारे १६४.५८ कोटी रुपयांची बचत झाली.मंत्री भरणे म्हणाले की, मोठ्याप्रमाणावर अयोग्य पीक विमा प्रस्ताव सादर करणाऱ्या ४८ सामूहिक सुविधा केंद्रांच्या चालकांविरुद्ध तालुका कृषी अधिकाऱ्यांनी गुन्हे दाखल केले आहेत. या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेमार्फत सुरू असून, चौकशीअंती दोषींवर आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

### अवैध गौण खनिज उत्खनन रोखणे व कारवाईसाठी स्वतंत्र टास्क फोर्स – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई : अवैध गौण खनिज उत्खननाची शासनाने गंभीर दखल घेतली असून अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खन रोखण्यासाठी; तसेच अशा प्रकरणांवर कठोर कारवाईसाठी स्वतंत्र टास्क फोर्सची स्थापना करण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.सदस्य नाना पटोले यांनी या संदर्भात विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य भास्कर जाधव यांनी सहभाग घेतला.

### कोकणातील आंबा–काजू उत्पादकांना नुकसान भरपाई देणार –कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

मुंबई : कोकण विभागातील अवकाळी पाऊस व हवामानातील प्रतिकूल परिस्थितीमुळे नुकसान झालेल्या आंबा व काजू उत्पादक शेतकऱ्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (एनडीआरएफ) अंतर्गत सुमारे २०९ कोटी रुपयांची, त्याचप्रमाणे हवामान आधारित पीक विमा योजनेंतर्गतची मदत १५ दिवसांच्या आत वितरित करण्यात येईल, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानसभेतील प्रश्नोत्तराच्या तासात दिली.सदस्य निलेश राणे यांनी सदरील प्रश्न उपस्थित केला होता.या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य शेखर निकम यांनी सहभाग घेतला.

### वणव्यांबाबत जनजागृती वाढविण्यावर भर दिला जाणार –वनमंत्री गणेश नाईक

मुंबई : कोकणातील वणव्यांच्या घटनांमागे मोठ्याप्रमाणात जनजागृतीचा अभाव आणि शेतकऱ्यांमधील गैरसमज कारणीभूत असल्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत सांगितले. वणवे रोखण्यासाठी वन विभाग, कृषी विभाग, ग्रामपंचायती, महसूल यंत्रणा तसेच लोकप्रतिनिधी यांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती मोहीम राबविली जाणार असल्याची माहिती त्यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली.सदस्य प्रशांत ठाकूर यांनी कोकणातील वणव्यांचा प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य नाना पटोले, सदस्य दीपक केसरकर यांनी उपप्रश्न विचारले.

### मुद्रांक नोंदणी प्रकरणातील गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी स्वतंत्र टास्क फोर्स – महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई : महसूल विभागातील मुद्रांक नोंदणी प्रक्रियेत झालेल्या कथित गैरव्यवहारांची राज्यस्तरीय चौकशी आता अकाउंटंट जनरल (एजी) कार्यालयामार्फत केली जाणार असून त्यासाठी स्वतंत्र टास्क फोर्स स्थापन करण्यात येईल, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.विधानसभा सदस्य जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी हा निर्णय जाहीर केला. यावेळी सदस्य नाना पटोले यांनीही उपप्रश्न उपस्थित केला.

### अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई; मालवाहू वाहनांचे परवाने रद्द होणार –मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई : राज्यात अवैध प्रवासी वाहतुकीमुळे होणारे अपघात रोखण्यासाठी मालवाहू वाहनांतून प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कठोर कारवाई करण्यात येणार असून अशा वाहनांचे परवाने रद्द करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानपरिषदेत दिली. याबाबत सदस्य सुनील शिंदे यांनी लक्षवेधी सूचना मांडली. यावेळी चर्चेत सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, ड.निरंजन डावखरे यांनी सहभाग घेतला. अधिकारी बेकायदेशीररित्या प्रवासी वाहतूक कारवाईत हलगर्जीपणा करत असल्यास त्यांच्याविरुद्धही कठोर कारवाई केली जाईल. याशिवाय, ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबांना लग्नसराईसारख्या प्रसंगी माफक दरात एसटी बसेस उपलब्ध करून देण्याची अभिनव योजना राबविण्याचा विचार शासन करत असल्याचे मंत्री सरनाईक यांनी यावेळी सांगितले.

## पाटोद्यात बालविवाहाचे भयावह वास्तव उघड, प्रशासनात खळबळ.!

### २२ अल्पवयीन गरोदर माता यामध्ये १५ वर्षांखालील तिघींचा समावेश..!!




#### व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा..

२२ अल्पवयीन गरोदर मातांची नोंद ही अत्यंत गंभीर बाब असून संपूर्ण व्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे. ग्राम बाल संरक्षण समिती, तालुका बाल संरक्षण समिती आणि स्थानिक प्रशासन यांच्यात प्रभावी समन्वय निर्माण होणे काळाची गरज आहे.

– अ‍ॅड. समीर पठाण,
संस्थापक, ग्रामीण विकास केंद्र तथा बालहक्क कार्यकर्ते

#### प्रकरण अत्यंत गंभीर, अहवाल वरिष्ठांकडे

आरसीएच प्रणालीमध्ये नोंद झालेल्या २२ अल्पवयीन गरोदर मातांची माहिती समोर आली आहे. त्यापैकी तीन माता १५ वर्षांखालील असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. या संदर्भातील अहवाल जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला असून वरिष्ठांच्या सूचनेनुसार पुढील कारवाई करण्यात येईल.

– डॉ. नरेंद्र कासट,
तालुका आरोग्य अधिकारी, पाटोदा

पाटोदा । प्रतिनिधी

**बालविवाह निर्मूलनासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर जनजागृती, कठोर कायदे आणि विविध यंत्रणा कार्यरत असतानाही पाटोदा तालुक्यातून समोर आलेल्या धक्कादायक आकडेवारीने संपूर्ण प्रशासनाला हादरा दिला आहे. आरोग्य विभागाच्या प्रजनन व बाल आरोग्य (ठउक) प्रणालीतील नोंदीनुसार तालुक्यात तब्बल २२ अल्पवयीन गरोदर माता असल्याचे समोर आले असून, त्यापैकी तीन माता १५ वर्षांखालील असल्याची माहिती पुढे आली आहे. या गंभीर वास्तवामुळे बालविवाह प्रतिबंधक यंत्रणांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

आरोग्य विभागाकडून गरोदर मातांची नियमित ऑनलाइन नोंदणी केली जाते. या प्रक्रियेदरम्यान अल्पवयीन गरोदर मातांची माहिती समोर आल्यानंतर जिल्हा बाल संरक्षण अधिकाऱ्यांनी तातडीने दखल घेत गटविकास अधिकारी यांना चौकशी करून संबंधितांवर आवश्यक कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. या प्रकरणाचा पाठपुरावा सामाजिक कार्यकर्ते व बालहक्क कार्यकर्ते ड. समीर पठाण यांनी केल्यानंतर प्रशासकीय हालचालींना वेग आला. गटविकास अधिकारी उद्धव सानप यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य विभाग, पंचायत विभाग आणि पोलिस प्रशासनाची संयुक्त बैठक घेण्यात आली. या बैठकीत सर्व प्रकरणांची सखोल पडताळणी करून अल्पवयीन गरोदर मातांचे वय, विवाहाची परिस्थिती आणि उपलब्ध पुरावे तपासण्याचे निर्देश देण्यात आले. विशेष बाब म्हणजे ही माहिती कोणत्याही तक्रारीतून नव्हे, तर शासनाच्या अधिकृत आरोग्य नोंदीतून समोर आली आहे. त्यामुळे गावपातळीवरील यंत्रणा, ग्रामपंचायती, बाल संरक्षण समित्या आणि स्थानिक प्रशासनाच्या देखरेखीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. अल्पवयीन मुलींचे विवाह होऊन त्या गरोदरपणापर्यंत पोहोचत असताना ही प्रकरणे संबंधित यंत्रणांच्या निदर्शनास कशी आली नाहीत, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. भारतात मुलींच्या विवाहासाठी किमान वय १८ वर्षे तर मुलांच्या विवाहासाठी २१ वर्षे निश्चित करण्यात आले आहे. यापूर्वी विवाह करणे अथवा करविणे हे बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ अंतर्गत दंडनीय गुन्हा आहे. विवाहास प्रोत्साहन देणारे, आयोजन करणारे, पालक किंवा संबंधित व्यक्तींवर कारवाईची स्पष्ट तरतूद कायद्यात आहे. अल्पवयीन मुलगी गरोदर असल्याचे समोर आल्यास आवश्यकतेनुसार पॉक्सो कायद्यांतर्गतही गुन्हे दाखल होऊ शकतात. ग्रामीण भागातील आर्थिक अडचणी, स्थलांतर, सामाजिक दबाव, मुलींच्या सुरक्षिततेबाबतची चिंता आणि कायद्याविषयी अपुरी जागरूकता यामुळे अनेक ठिकाणी आजही गुप्तपणे बालविवाह होत असल्याचे वास्तव समोर येत आहे. प्रशासनाने बालविवाह रोखल्यानंतर संबंधित मुलींच्या शिक्षण व संरक्षणाचा सातत्याने पाठपुरावा होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.

## • एकल महिला सन्मान दिन उत्साहात साजरा

## महाराष्ट्रातील शासकीय, प्रशासकीय महत्वपूर्ण घडामोडी...

रायगड–अलिबाग : अलिबाग नगरपरिषद, महसूल विभाग तसेच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र भूषण नानासाहेब धर्माधिकारी सभागृह, अलिबाग नगरपरिषद येथे आज एकल महिला सन्मान दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी एकल महिलांचा तुळशीचे रोप, शाल व श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अलिबाग नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा अ‍ॅड. मानसी म्हात्रे होत्या. प्रमुख उपस्थितीत मुख्याधिकारी सागर साळुंखे, महिला व बालकल्याण सभापती डॉ. साक्षी पाटील, उपसभापती अ‍ॅड. अश्विनी ठोसर, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती सुहिता ओव्हाळ तसेच नायब तहसीलदार मानसी पाटील उपस्थित होत्या.

**६ जुलै रोजी जिल्हास्तरीय लोकशाही दिन**

**रायगड–अलिबाग (जिमाका)**

सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी यांची न्याय व तत्परतेने शासकीय यंत्रणेकडून सोडवणूक करण्यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून लोकशाही दिन जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, विभागीय आयुक्त आणि मंत्रालय स्तरावर राबविण्यात येत असतो.त्यानुसार जिल्हास्तरावरील माहे जुलै २०२६ चा लोकशाही दिन सोमवार दि.६ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात दुपारी १.०० वा. जिल्हाधिकारी कार्याकायच्या राजस्व सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळविले आहे.

**धुळे जिल्ह्यासाठी पुढील ३ तास ऑरेंज अलर्ट**

धुळे : भारतीय हवामान विभाग, मुंबई यांनी धुळे जिल्ह्यासाठी पुढील तीन तासांसाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. जिल्ह्यात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस, मेघगर्जना, विजांचा कडकडाट तसेच जोरदार वारे वाहण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

**तांदुळवाडी दुर्घटनेतील मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाखांची आर्थिक मदत वितरित**

मुंबई : सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथे १४ जून २०२६ रोजी पिकअप वाहन विहिरीत कोसळून झालेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या ८ जणांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या मदतीनुसार मुख्यमंत्री सहायता निधी कक्षामार्फत एकूण ४० लाख रुपयांची मदत सोलापूर जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून संबंधित वारसांना वितरित करण्यात आली.

**खरीप पीक कर्जाचे सर्व उद्दिष्ट पूर्ण करा – जिल्हाधिकारी डॉ.विजय राठोड**

कोल्हापूर : कोल्हापूर जिल्ह्यासाठी सन २०२६–२७ या आर्थिक वर्षाकरिता तब्बल ४७ हजार कोटी रुपयांच्या वार्षिक पतपुरवठा आराखड्याला मंजुरी देण्यात आली असून सर्व बँकांनी समन्वयाने काम करून हे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड यांनी दिले. खरीप हंगामासाठी पात्र शेतकऱ्यांना पीक कर्जापासून वंचित ठेवू नये तसेच जुलैअखेर पीक कर्ज वितरणाचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**कंत्राटी स्वरुपात मानसोपचार तज्ञ पदाकरिता इच्छुकांनी अर्ज सादर करावेत**

रायगड–अलिबाग (जिमाका) :

जिल्ह्यामध्ये विविध पोलीस ठाणेंचे हद्दीत भिन्न–भिन्न समाजाचे नागरीक राहत असून त्यांच्या सणवार व विविध धार्मिक कार्य वेळोवेळी करीत असतात. त्यामध्ये मिरवणूका यांचा देखील समावेश असून अशा वेळी पोलीस ठाणेचे हद्दीमध्ये कायदा व सुव्यवस्था राखणे ही पोलीस दलाची महत्वाची भुमिका आहे. विविध प्रकारची न्यायालयीन प्रकरणे, कुटुंबापासुन दुर राहून करावे लागणारे कर्तव्य व अन्य प्रासंगिक कारणास्तव पोलीस विभागातील पुरुष व महिला अधिकारी नेहमी ताण–तणावाखाली दडपणाखाली वावरत असतात. अशा परिस्थितीत त्यांचे मनोबल/ मनोर्धर्य वाढविण्यासाठी ११ महिन्यांचे करारावर कंत्राटी स्वरुपात मानसोपचार तज्ञ नियुक्ती करावयाचे असून या पदासाठी इच्छुकांनी अर्ज सादर करावेत असे आवाहन कार्यालय अधीक्षक श्रीमती वनिता मोरे यांनी केले आहे.

**जिल्हा शंभर टक्के साक्षर करण्याचे उद्दिष्ट ठेवा – डॉ. जॅसमिन**

कोल्हापूर (जिमाका) : राज्याला कोल्हापुर ने नेहमीच एक वेगळी दिशा दिली आहे.केंद्र सरकार पुरस्कृत उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत संपूर्ण कोल्हापूर जिल्हा शंभर टक्के साक्षर करण्याचे उद्दिष्ट ठेवा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. जॅसमिन यांनी केले. जिल्हा परिषदेच्या व्हिडिओ कॉन्फरसिंग हॉल मध्ये नवभारत साक्षरता कार्यक्रम अंमलबजावणी अनुषंगाने जिल्हास्तरीय नियामक परिषदेची बैठक आज आयोजित करण्यात आली होती.यावेळी त्या बोलत होत्या.यावेळी जिल्हा सांख्यिकी विभागाच्या उपायुक्त सीमा अर्दाळकर,मनपा शिक्षण विभागाचे प्रतिनिधी विजय माळी, माध्यमिक शिक्षण विभागाचे(कक्ष अधिकारी ) चंद्रशेखर ओतारी, यांच्यासह संबंधित विभागाचे इतर अधिकारी उपस्थित होते.

# पावसाळी अधिवेशन २०२६ विधानसभा कामकाज, विधानसभा प्रश्नोत्तरे

## अवैध पार्सल वाहतूक करणाऱ्या खासगी बस चालकांवर परवाना निलंबनाची कारवाई करणार–परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई – राज्यात खासगी प्रवासी बसेस चालक मालकांनी बसमधून कुरिअर पार्सल अथवा अवैध माल वाहतूक केल्यास त्यांच्यावर परवाना निलंबनाची कारवाई करण्यात येईल, असे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासावेळी सांगितले.सदस्य शंकर जगताप यांनी विधानसभेत याविषयी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य भास्कर जाधव, सुनील प्रभू आणि सिद्धार्थ शितोळे यांनी उपप्रश्न विचारत सहभाग घेतला.**

### विधानसभा तालिका अध्यक्षांची नियुक्ती जाहीर

मुंबई – विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सुरुवात झाली असून विधानसभा कामकाजासाठी अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी तालिका अध्यक्षांची नियुक्ती सभागृहात जाहीर केली. सदस्य योगेश सागर, अर्जुन खोतकर, प्रतापराव पाटील–चिखलीकर, सुनील शेळके, कैलास पाटील, हेमंत ओगले, राजू खरे, समीर कुणावार आणि समाधान अवताडे यांची विधानसभा तालिका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आल्याचे अ‍ॅड. नार्वेकर यांनी जाहीर केले.

### ट्रिपल तलाक कायद्याची राज्यात काटेकोर अंमलबजावणी होणार – गृह राज्यमंत्री योगेश कदम

मुंबई : राज्यात ट्रिपल तलाक प्रतिबंधक कायद्याची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल आणि कोणत्याही महिलेवर अन्याय होऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत दिली. मुस्लिम महिलांवरील अन्यायाच्या घटनांकडे शासन अत्यंत संवेदनशीलतेने पाहत असून पीडित महिलांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासन सक्षमपणे कार्यरत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विधानसभा सदस्य देवयानी फरांदे यांनी यासंदर्भातील लक्षवेधी सूचना मांडली होती. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सना मलिक, अतुल भातखळकर, जयंत पाटील, मनीषा चौधरी, भास्कर जाधव, सुधीर मुनगंटीवार यांनी सहभाग घेतला. त्यास उत्तर देताना राज्यमंत्री कदम बोलत होते.बहुपत्नीत्वाच्या (पॉलिगामी) प्रश्नावर राज्यमंत्री कदम म्हणाले की, यूसीसी लागू झाल्यानंतर विवाहविषयक समान नियमांची अंमलबजावणी करण्यात येईल. त्यावेळी बहुपत्नीत्वा संदर्भातील आवश्यक तरतुदी आणि निर्बंधांचाही विचार केला जाईल. मुस्लिम महिलांना संरक्षण आणि न्याय देण्याबाबत सरकार पूर्णपणे कटिबद्ध आहे.

### वन्यजीव–मानव संघर्ष कमी करण्यासाठी व्यापक उपाययोजना राबविणार – वनमंत्री गणेश नाईक

मुंबई : विदर्भातील पाच जिल्ह्यांमध्ये वाघांच्या हल्ल्यांमुळे झालेल्या मृत्यूंच्या पार्श्वभूमीवर राज्य शासन वन्यजीव–मानव संघर्ष कमी करण्यासाठी व्यापक उपाययोजना राबवत असून पुढील ४२ महिन्यांत विदर्भातील प्रत्येक जिल्ह्यात ताडोबाच्या धर्तीवर व्याघ्र प्रकल्प, तर कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि खानदेशातील प्रत्येक जिल्ह्यात बिबट सफारी विकसित करण्यात येणार असल्याची माहिती वनमंत्री गणेश नाईक यांनी विधानसभेत दिली. विधानसभा सदस्य अतुल भातखळकर यांनी मानव वन्यजीव संघर्षावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याबाबत शासन करत असलेल्या कार्यवाहीबाबत लक्षवेधी सूचना मांडली. या सूचनेदरम्यान विधानसभा सदस्य विजय वडेट्टीवार, सुधीर मुनगंटीवार, जयंत पाटील, आदित्य ठाकरे, निलेश राणे, सुनील प्रभु तसेच नाना पटोले यांनी उपप्रश्न उपस्थित केले.

### शिवभोजन केंद्रांना गॅस पुरवठ्याबाबत शासन सकारात्मक – मंत्री छगन भुजबळ

मुंबई : शिवभोजन केंद्रांना व्यावसायिक गॅसचा पुरवठा सुरळीत करण्यासाठी शासन सकारात्मक असून, काही कारणांमुळे बंद पडलेली शिवभोजन केंद्रे लवकरच पुन्हा सुरू करण्यात येतील, अशी माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी विधानपरिषदेत दिली.राज्यातील विशेषतः पुणे व पिंपरी–चिंचवड परिसरातील शिवभोजन केंद्रांना व्यावसायिक गॅस पुरवठा करण्याबाबत विधानपरिषद सदस्या उमा खापरे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री भुजबळ यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली.

### छत्रपती संभाजीनगरातील स्मार्ट सिटी रुग्णालयासाठी १० कोटी रुपये देण्यात येणार – मंत्री उदय सामंत

मुंबई : छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी अंतर्गत उभारण्यात आलेल्या रुग्णालयाच्या कार्यान्वयनासाठी आवश्यक निधी तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत राज्य शासन सकारात्मक असून महानगरपालिकेला १० कोटी रुपये उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले जातील, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.सदस्य विक्रम काळे यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. तर सदस्य अनिल परब, अंबादास दानवे, चित्रा वाघ यांनी उपप्रश्न उपस्थित केले होते. त्यास उत्तर देताना सामंत बोलत होते.

### एसटी कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व वेतनवाढीचा लाभ–परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई : राज्य परिवहन (एसटी) महामंडळातील सुमारे ८६ हजार कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांना न्याय देण्यासाठी शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणेच एसटी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्ता, घरभाडे भत्ता आणि वार्षिक वेतन वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे, अशी घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज विधानसभा व विधानपरिषद मध्ये केली.

SHIV VANI
शिववाणी

क्रीडा,न्यायनिवाडा,
क्राईम घडामोडी...

सोमवार, दि.२९ जून २०२६
Monday, Dt. 29 June 2026

## क्रीडा विश्वातील ताज्या घडामोडी...



### आयर्लंडचा भारताला धक्का

टी-२० मालिकेची सुरुवात पराभवाने.. भारताविरुद्धच्या पहिल्या टी-२० सामन्यात आयर्लंडने ३४ धावांनी विजय मिळवत मालिकेत आघाडी घेतली. भारतीय फलंदाजी अपेक्षेप्रमाणे कामगिरी करू शकली नाही. दुसरा सामना आता 'करो या मरो' असा ठरणार आहे.



### फिफा विश्वचषकात बाद फेरीचे चित्र स्पष्ट

फिफा विश्वचषक २०२६ मध्ये बेल्जियम, स्पेन आणि फ्रान्स यांनी दमदार विजय मिळवत बाद फेरीतील स्थान अधिक मजबूत केले. काही नवोदित संघांनीही प्रभावी कामगिरी करून स्पर्धेत रंगत आणली आहे.



### विम्बल्डनची रंगत वाढली

जगातील सर्वोत्तम टेनिसपटू विम्बल्डनसाठी सज्ज झाले असून स्पर्धेपूर्वी सराव सामन्यांना सुरुवात झाली आहे. यंदा पुरुष आणि महिला गटात चुरशीची लढत अपेक्षित आहे.



### महाराष्ट्रातील फुटबॉलला नवी दिशा

महाराष्ट्र राज्य वरिष्ठ पुरुष फुटबॉल लीगनंतर राज्यातील क्लब फुटबॉलला नवी ओळख मिळत आहे. विविध जिल्ह्यांतील संघांना राष्ट्रीय स्तरावर पोहोचण्याची संधी निर्माण होत आहे.



### भारतीय बॅडमिंटनपटूंची पुढील स्पर्धांसाठी तयारी

आंतरराष्ट्रीय बॅडमिंटन हंगामातील आगामी स्पर्धांसाठी भारतीय खेळाडूंनी तयारी सुरू केली असून प्रशिक्षकांनी विशेष प्रशिक्षण शिबिरे आयोजित केली आहेत.



### विश्वचषकात नवोदित संघांची चमक

केप व्हर्डे, सेनेगलसारख्या संघांनी दमदार कामगिरी करत पारंपरिक बलाढ्य संघांनाही कडवी टक्कर दिली आहे. त्यामुळे विश्वचषकातील स्पर्धा अधिक रोमांचक बनली आहे.

### महाराष्ट्र ओपन पिकलबॉल स्पर्धेची घोषणा

मुंबईतील अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये 'महाराष्ट्र ओपन २०२६' पिकलबॉल स्पर्धेची घोषणा करण्यात आली. देशभरातील नामांकित खेळाडू सहभागी होणार असून महाराष्ट्रातील या खेळाला मोठी चालना मिळणार आहे.

**● खून, अवैध धंदे, सायबर गुन्हे आणि संघटित गुन्हेगारीवर पोलिसांचा प्रहार**

# मुंबई लोकलमध्ये क्षुल्लक वादातून तरुणाची निर्घृण हत्या










**मुंबई । प्रतिनिधी**

**उपनगरी रेल्वेत किरकोळ वादाचे रूपांतर थेट हत्येत झाले. २१ वर्षीय तरुणावर चाकूने वार करून त्याची हत्या करण्यात आली. या घटनेनंतर मुंबई लोकलमधील प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला.**

### पुण्यातील केतन अग्रवाल हत्याकांडाच्या तपासाला वेग..

पुणे - लोहगड ट्रेकदरम्यान झालेल्या केतन अग्रवाल यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी घटनादिवशी वापरण्यात आलेल्या इलेक्ट्रिक कारची फॉरेन्सिक तपासणी सुरू केली आहे. या प्रकरणात आणखी महत्त्वाचे पुरावे हाती लागण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### जालना पोलिसांचा अवैध धंद्यांवर मोठा प्रहार

जालना - महिनाभर चाललेल्या विशेष मोहिमेत जालना पोलिसांनी ४७० गुन्हे दाखल करून सुमारे १०.२६ कोटींचा मुद्देमाल जप्त केला. मटका, दारू, वाळू आणि इतर अवैध व्यवसायांवर ही मोठी कारवाई मानली जात आहे.

### वाळू माफियांविरोधात विशेष कृती दल

मुंबई - राज्यात वाढत्या अवैध वाळू उपशावर लगाम घालण्यासाठी राज्य सरकारने विशेष कृती दल स्थापन करण्याची घोषणा केली आहे. महसूल व पोलिस विभाग संयुक्तपणे कारवाई करणार आहेत.




### नागपुरातील वृद्ध महिलेवरील अत्याचाराने संताप

नागपूर - ७७ वर्षीय महिलेवर ई-रिक्षाचालकाने अत्याचार केल्याच्या घटनेने नागपूरसह राज्यभर संतापाची लाट उसळली. आरोपीला अटक करून पुढील तपास सुरू आहे.

### सायबर फसवणूक टोळीवर कारवाई

देशातील विविध राज्यांत ऑनलाइन ट्रेडिंग, डिजिटल अटक आणि गुंतवणुकीच्या नावाखाली नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळ्यांवर पोलिसांनी मोठी कारवाई केली. अनेक आरोपींना अटक करून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक माग काढण्यात आला.

### परभणीतील मंदिर दुर्घटनेनंतर गुन्हा दाखल होण्याची शक्यता

परभणी - जिल्ह्यात बांधकाम सुरू असलेल्या मंदिराचे छत कोसळून अनेक भाविकांचा मृत्यू झाला. बांधकामातील निष्काळजी पणाबाबत चौकशी सुरू असून संबंधितांवर फौजदारी कारवाईची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### संघटित गुन्हेगारीविरोधात राज्यांची संयुक्त मोहीम

विविध राज्यांतील पोलिसांनी संघटित गुन्हेगारी, अवैध शस्त्रे आणि फरार गुन्हेगारांविरोधात समन्वित कारवाया अधिक तीव्र केल्या असून अनेक संशयितांना ताब्यात घेण्यात आले आहे.






## सर्वोच्च न्यायालयात २१ ते २३ ऑगस्ट दरम्यान विशेष लोकअदालत

**लातूर । प्रतिनिधी**

**सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथील राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणामार्फत 'समाधान समारोह' या उपक्रमांतर्गत २१ ते २३ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सर्वोच्च न्यायालयात 'विशेष लोक अदालतीचे' आयोजन करण्यात आले आहे. या विशेष लोकअदालतीमध्ये लातूर जिल्ह्यातून सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली सर्व प्रकारची प्रलंबित तडजोडपात्र फौजदारी व दिवाणी प्रकरणे ठेवण्यात आली आहेत.**

यामध्ये प्रामुख्याने बँकिंग, दिवाणी, मोटार वाहन अपघात नुकसान भरपाई, ग्राहक तक्रार निवारण, परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ अंतर्गत धनादेश अनादर (चेक बाऊन्स) प्रकरणे, कौटुंबिक वाद, कामगार व औद्योगिक वाद, भूसंपादन आणि सेवेशी संबंधित प्रकरणांचा समावेश आहे. या सर्व प्रकरणांमध्ये संबंधित पक्षकारांमध्ये सौहार्दपूर्ण वातावरणात यशस्वी तडजोड व्हावी, या हेतूने नोटिसा बजावण्यात आल्या असून, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण लातूरचे सचिव व्यंकटेश गिरवलकर व प्रशिक्षित मध्यस्थ वकील यासाठी निरंतर प्रयत्न करत आहेत. तरी लातूर जिल्ह्यातून सर्वोच्च न्यायालयात दाखल प्रकरणांमधील संबंधित पक्षकारांनी आपले वाद सामोपचाराने मिटवून प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरण या कार्यालयास भेट द्यावी, असे आवाहन लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीस संजय भारुका, सचिव व्यंकटेश गिरवलकर आणि लातूर जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष शिवकुमार जाधव यांनी केले आहे.

## जळगाव स्थानिक प्राधिकरण मतदारसंघ निवडणुकीत नंदकिशोर महाजन विजयी

**जळगाव प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधान परिषदेच्या जळगाव स्थानिक प्राधिकरण मतदारसंघाच्या निवडणुकीत महायुती तथा भारतीय जनता पक्षाचे उमेदवार नंदकिशोर भागवत महाजन विजयी झाले. या निवडणुकीत नंदकिशोर महाजन यांना सर्वाधिक ५८२ मते मिळाली. मतमोजणी नंतर मा. भारत निवडणूक आयोगाच्या मान्यतेने जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या हस्ते विजयी उमेदवार नंदकिशोर भागवत महाजन यांना विजयी झाल्याचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.यावेळी खासदार स्मिता वाघ, आमदार सुरेश भोळे, आमदार मंगेश चव्हाण, आमदार अमोल जावळे तसेच संबंधित अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

## देशभरातील गाजलेले न्यायालयीन निर्णय, कायदा आणि प्रशासनावर दूरगामी परिणाम करणार?



**नवी दिल्ली / मुंबई । विशेष प्रतिनिधी**

**गेल्या आठवड्यात देशातील विविध न्यायालयांनी दिलेल्या महत्त्वपूर्ण निकालांमुळे न्यायव्यवस्था, प्रशासन आणि नागरिकांशी संबंधित अनेक प्रश्नांवर स्पष्ट भूमिका समोर आली. महाराष्ट्रासह देशातील प्रमुख न्यायालयीन घडामोडी याप्रमाणे,**

### मुंबई उच्च न्यायालयाचा मोठा दिलासा

मुंबई - जिल्हा न्यायाधीश भरती परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार

मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील जिल्हा न्यायाधीश भरती प्रक्रियेला आव्हान देणारी याचिका फेटाळून लावत २७ व २८ जून रोजी होणाऱ्या मुख्य परीक्षेचा मार्ग मोकळा केला. त्यामुळे भरती प्रक्रियेवरील अनिश्चितता दूर झाली.

### सर्वोच्च न्यायालयात महत्त्वाच्या दिवाणी व फौजदारी प्रकरणांवर आदेश..

नवी दिल्ली - सर्वोच्च न्यायालयाने आठवडाभरात विविध दिवाणी, फौजदारी, कर, विमा आणि प्रशासकीय प्रकरणांमध्ये महत्त्वाचे आदेश दिले. अनेक प्रकरणांमध्ये पुढील सुनावणीची तारीख निश्चित करत अंतरिम दिलासाही देण्यात आला.

### मुंबई उच्च न्यायालयात अनेक महत्त्वाच्या जनहित याचिकांवर सुनावणी

मुंबई - सामाजिक न्याय, सहकारी संस्था, शिक्षण आणि राज्य प्रशासनाशी संबंधित अनेक जनहित याचिकांवर मुंबई उच्च न्यायालयाने सुनावणी घेतली. काही प्रकरणांमध्ये राज्य सरकारला प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले.

### न्यायालयाचा प्रशासनाला स्पष्ट संदेश

विविध प्रकरणांमध्ये न्यायालयांनी सरकारी यंत्रणांना वेळेत निर्णय घेणे, नागरिकांचे हक्क अबाधित ठेवणे आणि प्रशासकीय दिरंगाई टाळण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले.

### सर्वोच्च न्यायालयात अनेक महत्त्वाच्या अपीलांवर सुनावणी

नवी दिल्ली - देशभरातील विविध उच्च न्यायालयांच्या निकालांना आव्हान देणाऱ्या अनेक अपीलांवर सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी घेतली. जमीन, सेवा, फौजदारी आणि कर विषयक प्रकरणांचा यात समावेश आहे.

### न्यायालयीन कामकाजाला गती

मुंबई - सर्वोच्च न्यायालय आणि विविध उच्च न्यायालयांनी प्रलंबित प्रकरणे जलद निकाली काढण्यासाठी नियमित सुनावण्यांवर भर दिला असून अनेक प्रकरणांमध्ये अंतिम युक्तिवाद सुरू करण्यात आले आहेत.

### महाराष्ट्रातील विविध न्यायालयांचे महत्त्वाचे आदेश

मुंबई - उच्च न्यायालयाच्या विविध खंडपीठांनी शिक्षण, सहकार, महसूल, नागरी वाद आणि प्रशासकीय निर्णयांशी संबंधित अनेक प्रकरणांमध्ये महत्त्वपूर्ण आदेश दिले.




हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी अंकिता ऑफसेट प्रिंटींग, प्लॉट नं.डी-३ एम.आय.डी.सी.बीड-४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : क्रांती नगर, तळेकर निवास जवळ, डॉ.बारकुल हॉस्पिटलजवळ, बीड येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत)

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ANKITA OFFSET PRINTING, POLOT NO.D-3, MIDC BEED-431122 AND PUBLISHED AT. THE OFFICE OF W E E K LY SHIVVANI, BEED OFFICE : KRANTI NAGAR, NEAR TALEKAR NIWAS, NEAR DR.BARKUL HOSPITAL, BEED. (JURISDICTION AT BEED)